# येता तुझी आठवण

येता तुझी आठवण आनंदित होतो क्षण
प्रफुल्लित झाले मन सार्थ जाहले जीवन...

नाही कोणी सान थोर सर्व असती एकसमान
होई देवा ही जादू रे धरिता तुझे चरण...

करिता तुझे पूजन संस्कारित होते मन
सकलांचा एकात्मा तू लीन होती सारेजण...

आता नसुदे दुरावा असो काहीही कारण
चुक सुधारूनी हे देवा मंगल करी रे जीवन...